## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये
## प्राप्त झालेली तक्रार
## तक्रार क्रमांक : २३५/२०२०

**तक्रारकर्ता, श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा,**
**रा.प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी,**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, ता.जि.अमरावती**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (पुरवठा),**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, ता.जि.अमरावती**

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.०८.२०२४

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी दि.२२.०८.२०२४ रोजी सुनावणी घेवून यात खालील प्रमाणे अंतरिम आदेश जारी करण्यात आले होते.

"सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र. ३२६०/२०१५ या प्रकरणात दि.२३.०१.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित मुळ तक्रारकर्ता श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी दि.२७.१०.२०२० रोजी कलम १८ (१) अन्वये वरील तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. वरील तक्रार अर्ज प्रलंबित असतांनाचे कालावधीत दि.२३.०१.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशातील परिच्छेद क्र.३ यात खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

"३. अपिलार्थीस योग्य प्रतिसाद दिला नाही, म्हणून केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ख) नुसार विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अपिलार्थीस नुकसान भरपाईपोटी धनादेशाद्वारे रुपये २०००/- ची नुकसान भरपाई द्यावी."

असे करित असतांना उपरोक्त आदेशात, मुळ तक्रारदार श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी दि.२२.०४.२०१४ रोजीचा तक्रार अर्ज जो विभागीय आयुक्त कार्यालयात सादर केला होता त्यावर विहीत मुदतीत निकाली न काढल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना तक्रारकर्त्यास कुठलीच माहिती प्रदान करता आली



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय सत्यमेव जयते अमरावती विभाग, अमरावती

नसल्याचा निष्कर्ष नोंदवित तसेच मुख्य सचिव यांचे दि.१८.०१.२०१३ रोजीचे परिपत्रकाचा हवाला देत उपरोक्त आदेश पारित करण्यात आले असल्याचे आढळून येते. याप्रकरणी प्राधिकरणाचे वतीने उपायुक्त पुरवठा यांनी दि.५.०७.२०२४ रोजी लेखी निवेदन सादर केले असून, यात तत्कालीन विभागीय आयुक्त यांचा सदर प्रकरणाशी व प्रत्यक्ष कुठलाही संबंध नाही तसेच सदर प्रकरणात पक्षकार सुध्दा नसून सदर नूकसान भरपाई देण्याची बाब क्षमापीत करण्यात यावी, अशी विनंती केली असून, तक्रारकर्ता यांना अपेक्षीत असणारी माहिती दि.२८.०१.२०१९ रोजी निशुल्क प्रदान केली असल्याबाबत कार्यालयाच्या नस्तीतील उपलब्ध कागदपत्रांच्या नोंदीप्रमाणे स्पष्ट होत असल्याचेही यात नमूद केलेले आहे. तसेच अर्जदारास पाहिजे असलेल्या माहिती करिता दि.०४.०६.२०१५ रोजी केलेल्या अर्जानूसार दि.१७.०६.२०१५ अन्वये माहिती देखील पुरविण्यात आली असल्याची बाब नमूद केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी पारित केलेल्या आदेशाच्या परिच्छेद क्र.३ संदर्भात अपिलार्थी श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी उपरोक्त प्रकरण सुनावणी दरम्यान तत्कालीन मा.आयुक्त महोदय यांनी प्राधिकरणास नुकसान भरपाई देण्याबाबत निर्देश दिले असून, त्यात टंकलेखनाच्या चुकीमुळे विभागीय आयुक्त असा उल्लेख झाला असल्याबाबत स्वत:च प्रांजळपणे कबुल केलेले आहे. ही बाब लक्षात घेता, तसेच मुळ अपिलार्थी/तक्रारदार श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनीच नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेले विभागीय आयुक्त, अमरावती यांचेबाबतचा उल्लेख हा अशुध्द टंकलेखनामुळे आलेला आढळून येतो. ही बाब लक्षात घेता, तक्रारकर्ता श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांचे मान्यतेनूसार प्रस्तुत प्रकरणी परिच्छेद क्र.३ मध्ये विभागीय आयुक्त, अमरावती यांचा झालेला उल्लेख हा श्रुतलेखन /टंकलेखनातील चुकीमुळे झाला असल्याने उपरोक्त बाबीबाबत शुध्दीपत्रक निर्गमित करणे योग्य ठरेल. प्राधिकरणाने दाखल केलेले निवेदन तसेच मुळ अपिलार्थी /तक्रारदार यांनी प्रांजळपणे केलेले कथन लक्षात घेता, उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्र. ३ हे मागे घेण्यात येत आहे. तसेच आदेशातील मुद्या क्र.१ व २ व एकंदरीतच स्वस्त धान्य दुकानाबाबत तक्रारकर्ता यांनी केलेल्या मुळ तक्रार अर्जावर प्राधिकरणाने दिलेला प्रतिसाद व इतर बाबीवर सविस्तर सुनावणी घेण्यात येईल."

**सही/-**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०८.२०२४**
जावक क्रमांक ६०३८ दिनांक ०३.०९.२०२४

**अपील क्रमांक :- २३५/२०२०**
**तक्रारदार, श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा.**

**सुनावणी दिनांक १७.०४.२०२५(In Continuation of Order dt.२२.०८.२०२४)**

वरील पारित आदेशाचे अनुपालनासाठी सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १७.०४.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.अपर्णा दाभाडे, निरिक्षण अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.शैलेष देशमुख, सहा.वि.पुरवठा अधिकारी हे उपस्थित आहेत.

## विवेचन

अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, आयोगाने अपील क्र.३२६०/२०१५ या प्रकरणात दि.२३.०७.२०२० रोजी दिलेल्या आदेशानूसार अपिलार्थीने विभागीय आयुक्ताकडे दाखल केलेली तक्रार ३ महिन्यात निकाली काढून अपिलार्थीस माहितीचे निशुल्क प्रदान करावे त्याचप्रमाणे माहितीचा अर्ज तक्रारीवर आधारीत असून तो ३ महिन्यात निकाली काढणे बंधनकारक असतांना ५ वर्षाचा कालावधी पार पडूनही तक्रार प्रलंबित आहे, याची विभागीय आयुक्त, अमरावती यांनी विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ चे कलम १०(१) नूसार संबंधीतांवर जबाबदारी निश्चीत करुन कलम १० (२) नूसार कार्यवाही करावी व आयोगास अनुपालन अहवाल ३ महिन्यात सादर करावा. तसेच अपिलार्थीस योग्य प्रतिसाद दिला नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ख) नूसार विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अपिलार्थीस नुकसान भरपाईपोटी धनादेशाद्वारे रु.२०००/- इतकी नूकसान भरपाई द्यावी, असे आदेश दिले होते. त्यानंतर या आदेशाचे अनुपालन न झाल्याने तक्रारदार यांनी तक्रार क्र. २३५/२०२० दाखल केली. या तक्रारीचे अनुषंगाने मा.तत्कालीन राज्य माहिती आयुक्त यांनी दि.२२.०८.२०२४ रोजी आदेश पारित करुन मुळ आदेशातील मुद्या क्र. ३ हा अशुध्द टंकलेखनामुळे झालेला असल्याने तो वगळण्यात आला. तथापि, अद्यापही विभागीय आयुक्त कार्यालया तर्फे मुद्या क्र. १ व २ चे अनुपालन झालेला नाही, असा युक्तीवाद अपिलार्थी यांचेतर्फे करण्यात आला.

यासंदर्भात प्रतिवाद करतांना विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.शैलेश देशमुख यांनी असे निवेदन केले की, यासंदर्भाने त्यांचा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेशी पत्रव्यवहार चालू आहे. तथापि, त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाला नसल्याने तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने चौकशी अपूर्ण आहे. यासंदर्भात तत्कालीन उपायुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी यवतमाळ जिल्हाधिकारी कर्यालयातील जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.सुधाकर पवार यांना व्यक्तीश: बोलावून या प्रकरणात तातडीने अहवाल सादर करण्याबाबत निर्देशीत केले होते. तथापि, त्यानंतर सुध्दा जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे आयोगाच्या आदेशाची पुर्तता होवू शकली नाही.

यासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथील उपआयुक्त (पुरवठा), यांनी दि.०५.०७.२०२४ रोजी एक अहवाल तयार केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, मा.राज्य माहिती आयुक्तांचे दि.२३.०१.२०१९ च्या आदेशाची प्रत त्यांचे कार्यालयाच्या नस्तीत उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर आदेश प्राप्त करुन घेण्याकरीता सोमवार दि.२४.०६.२०२४ रोजी दुपारी ०३.३० वाजता या कार्यालयाचे सहायक विभागीय पुरवठा अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी श्री.शैलेश देशमुख व संबंधीत कारकुन यांनी संदर्भीय आदेश ज्या कार्यासनाकडून निर्गमित झाला आहे त्या कार्यासनाशी संबंधीत कर्मचाऱ्याशी भेट घेतली व आदेशाची प्रत देण्याबाबत विनंती केली. संबंधीत कार्यासनाने राज्य माहिती आयोगाच्या वेबसाईला जावून आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिली व त्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष मा.राज्य माहिती आयुक्तांची भेट घेतली व



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, खंडपीठ अमरावती विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

प्रकरणातील वस्तुस्थिती त्यांचे निदर्शनास आणून दिली होती, असे उपआयुक्त (पुरवठा) यांनी त्यांचे अहवालात म्हटले आहे.

असे उपआयुक्त (पुरवठा) यांनी त्यांचे अहवालात पुढे असेही म्हटले आहे की, अपिलार्थी यांना दि.२८.०१.२०१९ रोजी निशुल्क माहिती दिलेली आहे. अर्जदारास पाहिजे असलेल्या माहिती करीता त्यांनी दि.०४.०२.२०१५ रोजी केलेल्या अर्जानूसार उपआयुक्त (पुरवठा) यांचे कार्यालयाचे पत्र क्र.आकाअ/पुरवटा/कावि५१९/२०१५ दि.१७.०६.२०१५ अन्वये माहिती पुरविण्यात आलेली असल्याने तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही. त्यामुळे संबंधीतां विरुध्द कायदेशीर कार्यवाही करणे हे वर्तमानरोजी न्यायोचित होणार नाही.

उपआयुक्त (पुरवठा) यांचे अहवालाचे अवलोकन केल्यानंतर असे लक्षात येते की, त्यांनी मा.राज्य माहिती आयुक्त यांच्या दि.२३.१.२०१९ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशाचे योग्यरितीने अवलोकन केलेले नाही. सदर आदेशात तत्कालीन जन माहिती अधिकारी विरुध्द कार्यवाही करण्यासाठी कोणतेही निर्देश तत्कालीन मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेले नव्हते तर या प्रकरणातील तक्रारदार असलेले श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी दाखल केलेली तक्रारी आगामी ३ महिन्यात विभागीय आयुक्त कार्यालयाने निकाली काढून अपिलार्थीस माहितीचे निशुल्क प्रदान करावे, असे आदेश दिले होते. त्याच प्रमाणे माहितीचा अर्ज हा तक्रारीवर आधारीत होता आणि कोणतीही तक्रार ३ महिन्यात निकाली काढणे बंधनकारक आहे व तशा प्रकारची तरतुद विलंबास प्रतिबंध अधिनियमाचे कलम १०(१) मध्ये आहे. असे असतांना सदर तक्रार ५ वर्षाच्या कालावधीसाठी प्रलंबित राहिल्याने या अनुषंगाने जबाबदारी निश्चीत करावी, असे मा.तत्कालीन राज्य माहिती आयुक्तांनी आदेश दिले होते. हे आदेश समजुन न घेता, उपआयुक्त (पुरवठा) यांनी काहीही संबंध नसलेल्या बाबी संबंधाने अनुपालन अहवाल सादर केलेला आहे. उपआयुक्त (पुरवठा) दर्जाच्या अधिकाऱ्याकडून अशा प्रकारचा अहवाल प्राप्त झाल्याबदल नाराजी व खेद व्यक्त करण्यात येत आहे.

तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीचे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अंतर्गत चौकशी करने सद्यास्थितीत आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या निवेदनानूसार सदरचे प्रकरण जिल्हा पुरवठा अधिकारी, यवतमाळ यांचे स्तरावर कार्यवाहीसाठी प्रलंबित असल्याचे दिसून येते. त्यांनी या प्रकरणात काय कार्यवाही केली आहे, हे आयोगास जाणून घेणे आवश्यक आहे. सबब, माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. श्री.सुधाकर पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तसेच दिवाणी प्रक्रिया सहिंता (order ५) मधील तरतुदोनूसार साक्षी करीता आयोगासमोर उपस्थित राहण्यासाठीचे समन्स पाठविण्यात यावे. सदर समन्स ची बजावणी जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ व पोलीस निरीक्षक, यवतमाळ शहर पोलीस ठाणे यांनी पाठवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १७.०४.२०२५**

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
२) जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ.
३) पोलीस निरीक्षक, यवतमाळ शहर पोलीस ठाणे, यवतमाळ.

जावक क्रमांक 3440 दिनांक 21/04/2025